तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फोन नं २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in

जा क्र. तंशिविकापु/विवि/ईबीसी/२०१६-१७/4841 दिनांक 2/12/16

प्रति,

प्राचार्य,

शासकीय तंत्रनिकेतन, पुणे/कराड/सोलापूर/कोल्हापूर/मिरज/अवसरी

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड/पुणे/अवसरी.

शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड/म. रा. हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी, पुणे.

कुसरो वाडीया इंन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे.

विषय :- खाजगी विनाअनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमधील शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील आर्थिक मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या (राजर्षी छत्रपती शाहू महाराज)शिक्षण शुल्क प्रतिपुर्ति योजनेचे अर्ज तपासणी करणेबाबत. (पदवी/पदव्युत्तर पदवी/पदविका)

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र टीईएम-२०१५/प्र.क्र २१९/तांशि-४ दि ३१ मार्च २०१६

२. शासन निर्णय क्र टीईएम-२०१६/प्र.क्र ५०१/तांशि-४ दि १३ ऑक्टोबर २०१६

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की वरील संदर्भाधीन पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ करीता अर्थिक मागासवर्गीय (राजर्षी छत्रपती शाहू महाराज) विद्यार्थ्याच्या शिक्षण शुल्क परताव्याबाबतचे अर्ज खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थाकडून आपल्या कडे तपासणीसाठी सादर करतील त्याची तपासणी आपल्या संस्थेत तपासणी समिती नियुक्त करुन शासन निर्णयातील सूचनांप्रमाणे व खालील मार्गदर्शक तत्वानुसार तपासून घेऊन त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावयाचा आहे.

समितीने खालील निकषांची काटेकोरपणे तपासणी करावयाची आहे.

१) शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी सादर केलेला ऑन लाईन पध्दतीच्या अर्जाची प्रत.

२) अर्जासोबत अधिवास प्रमाणपत्र जोडण्यांत आले आहेत याची खात्री करण्यांत यावी.

३) रेशन कार्डाचे पहिले व शेवटच्या पानांची साक्षांकीत छायाप्रत (शक्यतो प्राचार्यांनी साक्षांकीत केलेली असावी)

४) कुटूब मर्यादा प्रमाणपत्र जोडण्यांत आले आहेत याची खात्री करण्यात यावी

५) सक्षम अधिका-यांकडून प्राप्त केलेला उत्पन्नाचा दाखला मूळ प्रत घ्यावी जर एकाच वेळेस एकाच कुटुंबातील दोन विद्यार्थ्यांनी ईबीसी साठी प्रस्ताव दाखल केला असेल अशा वेळी दुस-या अपत्याने जेथे प्रवेश घेतला आहे त्या संस्थेच्या संस्था प्रमुखांनी दाखला साक्षांकीत करावा .शासन निर्णय नमूद केल्यानुसार (**सक्षम अधिकारी म्हणजे तहसीलदार/ नायब तहसीलदार उत्पन्न मर्यादा रु. ६ लाख / रकमेच्या आत असणे आवश्यक राहील**)

६) तंत्रशिक्षणाशी निगडीत पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतलेला आहे अशाच विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

७) थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी तसेच औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

८) अभिमत विद्यापीठांना ही सवलत लागू राहणार नाही.

९) ज्या विद्यार्थ्यांनी इयत्ता ११ वी किंवा १२ उत्तीर्ण/किंवा अनुतीर्ण होऊन पदविका अभियांत्रिकी प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतलेला आहे **अशा विद्यार्थ्यांना जर त्यांनी सदर सवलत यापूर्वी घेतली असेल तर तितकी वर्ष अशा विद्यार्थ्यांना ईबीसी सवलतीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.**

१०) **ज्या विद्यार्थ्यांनी १२ वी नंतर फार्मसी पदविका/पदविका थेट द्वितीय वर्ष अभियात्रिकी /पदवी अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र पदवी/आर्किटेक्चर पदवी/ अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे परंतु विद्यार्थ्याने जर बारावीच्या पुढील शिक्षण घेतले असल्यास पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती घेतलेली नाही असे प्रमाणपत्र बारावी नंतरच्या कॉलेज कडुन प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.**

११) एस.एस.सी / एच.एस.सी. /पदवी /पुर्वीच्या वर्षी घेत असलेल्या अभ्यासक्रमामध्ये उत्तीर्ण/ए.टी.के.टी. गुणपत्रिका साक्षांकित प्रत असणे आवश्यक.

१२) शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता शिक्षण शुल्क भरल्याची पावती (पूर्ण फी/पार्टपेमेंट केल्याची पावती.

१३) विद्यार्थी हा जर चौथे अपत्य असेल तर त्यास ईबीसी मंजूर करु नये याबाबत पुरावा रेशन कार्डाची साक्षांकीत प्रत तपासावी.

१४) शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेली शिक्षण शुल्क आदेशाची साक्षांकीत प्रत (प्रस्तावात मागणी केलेल्या प्रत्येक वर्ष निहाय)

१५) **ज्या पदवी /पदविका संस्था शासनाच्या केंद्रिय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी नाहीत अशा संस्थांचे अर्ज तपासणी करण्यांत येऊ नये.**

१६) ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश संस्थास्तरावर (Institute level) रिक्त जागांवरील प्रवेश (Against Cap) प्रवेशित विद्यार्थ्यांना ई.बी.सी. मंजूर करण्यांत येऊ नये.

१७) वडील हयात असतील तर वडीलाचे उत्पन्न दाखलाच आवश्यक व विभक्त कुटुंब असेल तर घटस्फोटाच्या प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत आवश्यक, वडील हयात नसतील तर वडीलांचे मृत्यू प्रमाणपत्र सादर करुन घ्यावे.

१८) तपासणी केंद्राने जर एखादा अर्ज नामंजूर केला असेल तर तो कोणत्या कारणास्तव नामंजूर केला आहे. संबंधीत अर्जावर तसा शेरा मारण्यांत यावा.**नामंजूर अर्जाबाबतची माहिती संस्थेने तात्काळ संबंधीत विद्यार्थ्यास लेखी स्वरुपात दयावयाची आहे.**

१९) सदर ईबीसी अर्ज तपासणी करुन झाल्यानंतर सर्व अर्ज संस्थेकडे परत पाठवावेत. सदरचे अर्ज संस्थेने विद्यार्थ्याचा अभ्यासक्रम .पूर्ण होई पर्यंत जतन करुन ठेवावेत. तसेच विभागीय कार्यालय/ संचालक, कार्यालयास आवश्यकता भासल्यास अर्जाची मागणी करण्यांत येईल तेव्हा ते या कार्यालयास उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

२०)ईबीसी मागणी करणा-या सर्व विद्यार्थ्यांचे बँक खाते **राष्ट्रीयकृत बँकेमध्ये उघडणे अनिवार्य** आहे. तसेच सदर बॅक खाते आधार क्रमाकांशी लिंकड आसणे आवश्यक आहे .तसे प्रमाणपत्र संबधीत संस्थेच्या प्राचार्यकडून घ्यावे

२१)शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता सादर केलेले ऑनलाईन अर्जच फक्त तपासावेत

आर्थिक मागास विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क परताव्याबाबतचे अर्ज तपासणी करीता आपल्या स्तरावर दोन समिती गठीत करण्यांत येऊन अर्ज तपासणी काम करावयाचे आहे. सदर समितीमधील सदस्य खालील प्रमाणे राहतील.

१. प्राचार्य/ संचालक :- अध्यक्ष
२. दोन अधिव्याख्याता निवड श्रेणी (प्रत्येक समितीवर एक) :- सदस्य
३. विद्यार्थी विभागातील कर्मचारी :- सदस्य (आवश्यक्तेनुसार)
४. एक प्रोग्रॅमर व एक डाटा एन्ट्री ऑपरेटर

वरील सर्व निकषांची काटेकोरपणे तपासणी करुन मगच अहवाल विहीत नमुन्यात सादर करावा. तसेच संस्थेच्या अहवालावर **Checked and found correct** असा शेरा मारुन खाली समितीच्या सर्व सदस्यांच्या सहया करणे अनिवार्य आहे.. आपल्याकडे नमुद केलेल्या सर्व संस्थांची ईबीसी अर्जाची तपासणी दिनांक १०/१२/२०१६ पर्यत पूर्ण करावयाची आहे. आपल्या संस्थेचा एकत्रित अहवाल या कार्यालयास दिनांक १५/१२/२०१६ पूर्वी सादर करण्यांत यावा.

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत :- शासन निर्णय , पात्रतेच्या अटी व शर्ती

प्रत :-

१. प्राचार्य, सर्व अशासकीय विनाअनुदानित पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी संस्था प्रमुखांना असे कळविण्यांत येते की, उपरोक्त पत्रासोबत जोडलेल्या तक्त्यात नमुद केलेल्या आपल्या जिल्हयामधील शासकीय तंत्रनिकेतन,अभियांत्रिकी/शासकीय अनुदानित संस्था/यांचेकडून आपल्या संस्थेचे ईबीसी प्रस्तावाची छाननी दिनांक १०/१२/२०१६ पूर्वी संबंधीत शासकीय तंत्रनिकेतन/अभियांत्रिकी/अनुदानित संस्था यांचेशी दूरध्वनीद्वारे संपर्क करुन तपासणीचा दिनांक निश्चित करुन घेऊन अर्ज तपासणीचे कामपूर्ण करुन घेण्यांत यावे तद्नंतर येणा-या संस्थांचे अर्ज तपासणी केली जाणार नाही. याची सर्व संस्थांप्रमुखांनी नोंद घ्यावी. तसेच बजेटवर तपासणी अधिका-यांचा **Checked and found correct** असा शेरा घेणे अनिवार्य आहे.
२. प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

(राजर्षी छत्रनती शाहू महाराज) प्रस्तावांची छाननी करुन घेण्याबाबतचा तक्ता
शैक्षणिक वर्ष २०१६-१७ अर्ज तपासणी केंद्र
अतिम दिनांक १०/१२/२०१६

तपासण्ाी केंद्राचे नांव पुणे जिल्हा	**तपासणी साठी उपस्थित रहावयाच्या संस्था**
शासकीय तंत्रनिकेतन, पुणे ४११ ०१६. (दूरध्वनी क्रमांक २५६५७९०७)	सर्व पदविका तंत्रनिकेतने, (आंबेगाव/जुन्नर खेड तालुका संस्था वगळून)
कुसरो वाडीया इंन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे (दूरध्वनी क्रमांक २६१६४८१४/२५)	पदव्युत्तर पदवी एमबीए/एमसीए **(आंबेगाव/जुन्नर खेड तालुका संस्था वगळून)**
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे (दूरध्वनी क्रमांक ०२०/२५५०७०००/२५५०७१०२/१०१)	सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी **(आंबेगाव/जुन्नर खेड तालुका संस्था वगळून)**
महाराष्ट्र राज्य हॉटेल मॅनेजमेंट अॅन्ड केटरींग टैक्नॉलॉजी, पुणे (दूरध्वनी क्रमांक २५६७७१८९)	सर्व विना अनुदानित हॉटेल मॅनेजमेंट अॅन्ड केटरींग टेक्नॉलॉजी , औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका (आंबेगाव/जुन्नर खेड तालुका संस्था वगळून)
तपासण्ाी केंद्राचे नांव आंबेगांव तालुका/जुन्नर,खेड,तालुका	**तपासणी साठी उपस्थित रहावयाच्या संस्था**
शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी, पुणे (दूरध्वनी क्रमांक ०२१३३/२२५८०१)	अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था **फक्त आंबेगांव, जुन्नर, खेड तालुक्यामधील संस्था**
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी, पुणे (दूरध्वनी क्रमांक ०२१३३/२२५९००/२२५९०१)	अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था **फक्त आंबेगांव, जुन्नर, खेड तालुक्यामधील संस्था**
सातारा जिल्हा तपासणी कार्यालय	**तपासणी साठी उपस्थित रहावयाच्या संस्था**
शासकीय तंत्रनिकेतन, कराड (दूरध्वनी क्रमांक ०२१६४/२७२९६२)	सातारा जिल्हयामधील सर्व पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड	सातारा जिल्हयामधील सर्व पदवी अभियांत्रिकी /वास्तुशास्त्र पदवी, पदव्युत्तर पदवी एमबीए/एमसीए संस्था
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड	सातारा जिल्हयामधील सर्व पदवी/पदविका औषधनिर्माणशास्त्र संस्था
सोलापूर जिल्हा तपासणी कार्यालय	**तपासणी साठी उपस्थित रहावयाच्या संस्था**
शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर (०२१७/२६५३९२५)	सर्व पदविका पदवी अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र वास्तुशास्त्र पदव्युत्तर पदवी एमबीए/एमसीए
कोल्हापूर जिल्हा तपासणी कार्यालय	**तपासणी साठी उपस्थित रहावयाच्या संस्था**
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर (दूरध्वनी क्रमांक ०२३१/२६५३९२५)	सर्व पदविका पदवी अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र वास्तुशास्त्र पदव्युत्तर पदवी एमबीए/एमसीए
सांगली जिल्हा तपासणी कार्यालय	**तपासणी साठी उपस्थित रहावयाच्या संस्था**
शासकीय तंत्रनिकेतन, मिरज दूरध्वनी क्र.०२३३/२२३१२६९	सर्व पदविका पदवी अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र वास्तुशास्त्र पदव्युत्तर पदवी एमबीए/एमसीए

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना

शैक्षणिक वर्ष २०१६-१७

विदयार्थ्यासाठी सर्वसामान्य सूचना

१. राज्यातील सर्व खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये / तंत्रनिकेतने (खाजगी अभिमत/स्वयं अर्थसहाय्य विदयापिठे वगळुन) आणि शासकीय, शासन अनुदानित व शासकीय विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतनांमधील (शासकीय अभिमत विदयापिठंसह) या योजनेंतर्गत निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिका-यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घेणारे विद्यार्थ्यांकरीता हि योजना आहे.

२. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विदयार्थ्याने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या www.dtemaharashtra.org.in/ebc2016 या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अचूक माहिती विहित मुदतीत भरणे आवश्यक आहे. विदयार्थ्याने स्वत:च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी देण्यात आलेला Application ID व Password चा वापर करावा. Application ID व Password बाबत काहीसमस्या उदभवल्यास संस्थेच्या प्राचार्याशी संपर्क साधावा व बदलवून घ्यावा. संचालनालयाकडे उपलब्ध असलेल्या विद्यार्थ्याच्या मोबईल क्रमांकावर तसेच इमेल वर सुद्धा याबाबत सूचना देण्यात येतील. विद्यार्थ्याने Application ID व Password योग्यरित्या गुप्तपणे जतन करुन ठेवावा व इतरांना देऊ नये.

३. योजनेबाबत संकेत स्थळावर माहिती भरण्याकरिता शैक्षणिक कागदपत्रे १० वी, १२ वी, स्नातक व मागिल वर्षी उत्तीर्ण गुणपत्रिका, अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड, प्रवेश फी, बॅक खाते पावती, इत्यादी प्रमाणपत्रे उपलब्ध ठेवणे.

४. संकेत स्थळावर माहिती भरल्यानंतर माहिती जतन करावी व प्रिंट घेऊन त्यावर स्वत:, पालक तसेच संबधीत प्राधिकारी यांची स्वाक्षरी घेण्यात यावी.

५. अर्जा सोबत शैक्षणिक कागदपत्रे, महाराष्ट्र (वादग्रस्त महाराष्ट्र-कर्नाटक सीमा क्षेत्रातील विद्यार्थाकरिता कर्नाटक) राज्याचे अधिवास प्रमाणपत्र, दोन्ही पालकाचे उत्पन्न प्रमाणपत्र (तहसीलदार यांनी दिलेले), १०वी, १२वी पदवी, स्नातक इत्यादी तसेच मागील वर्षी उत्तीर्ण परीक्षेची गुणपत्रिका, शिक्षण शुल्क भरल्याची पावती, आधारकार्ड इत्यादी अर्जासोबत जोडणे व त्याप्रमाणे जोडलेल्या कागदपत्राची नोंद अर्जात करावी. तसेच प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडावे.

६. अर्ज व संबंधीत सर्व शैक्षणिक कागदपत्रे संस्थेस विहीत मुदतीत द्विप्रतीत जमा करावी व संस्थेकडून पोच घ्यावी. विद्यार्थ्यास त्याची अर्जाची स्थिती व मजुरीबाबत माहिती लॉगइन केल्यानंतर प्राप्त होईल.

७. आधारकार्ड क्रमांक व बँक खाते क्रमांक संकेत स्थळावर अचूक नोंदविण्याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन पडताळणी होऊन बँक खात्यात रक्कम जमा होणे सुलभ होईल.

८. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४ दि. १३ ऑक्टोबर, २०१६ व शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/ प्र.क्र.२१९/तांशि-४, दि. ३१ मार्च २०१६ यामधील अटी व शर्तीची माहिती नमुद करून घ्यावी.

९. शिक्षण शुल्क प्रतीपुर्तीची लाभार्थी विदयार्थ्याची यादी संचालनालयाच्य संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल.

१०. विदयार्थ्याने व संस्थेने शासन निर्णयाचे अवलोकन करावे वत्यातील माहिती ग्राह्य राहील.

११. संपर्कासाठी ebc@dtemaharashtra.gov.in वर इमेल करावा वत्यात नाव व Application ID नमूद करावे

----x----

"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना"

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी पात्रतेचे निकष:

१. सदर योजना ही खाजगी विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये / तंत्रनिकेतने (खाजगी अभिमत /स्वयं अर्थसहाय्य विद्यापीठे वगळून) आणि शासकीय , शासन अनुदानित व शासकीय विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतनामधील (शासकीय अभिमत विद्यापीठासह) शासन निर्णय दि. १३ ऑक्टोंबर २०१६ मध्ये नमुद केलेल्या अभ्यासक्रमासाठी शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रकीयेव्दारे (CAP) प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागु राहील.

२. सदरहू योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबांचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न मर्यादा रू. २.५० लाख व त्यापेक्षा कमी आहे. अशा प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क नियमन प्राधिकरणाव्दारे निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के पर्यंतची प्रतिपुर्ती शासनाकडून करण्यात येईल व ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न मर्यादा रू.२.५० लाख ते रू. ६ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी पदवी / पदव्युत्तर पदवी/ इयत्ता १२ वी नंतरच्या पदविका या व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी इयत्ता १२ वी नंतरच्या परिक्षेमध्ये व इयत्ता १० वी नंतरच्या पदविका अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी इयत्ता १० वी च्या परिक्षेमध्ये एकत्रित किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त असतील अशाच विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी प्रतिपुर्ती करण्यात येईल.

३. सदर योजनेतर्गत उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारित येणारे अभ्यासक्रम खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशिल	अभ्यासक्रम (प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष)
१	पदविका	अभियांत्रिकी, औषधनिमाणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी
२	पदवी	अभियांत्रिकी, औषधनिमाणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी
३	पदव्युतर पदवी	मास्टर ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट / मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मास्टर ऑफ कॉम्पुटर अप्लिकेशन (एम.सी.ए.)

४. वरील नमूद राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ हा शैक्षणिक वर्ष २०१६-१७ व त्यापूर्वी ज्या विदयार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे तसेच वादग्रस्त महाराष्ट्र-कर्नाटक सीमा क्षेत्रातील विदयार्थ्यांसह जे विदयार्थी वरील अटींची पूर्तता करतील अशा सर्व विदयार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून पुढे लाभ अनुज्ञेय असेल.

५. या योजनेंतर्गत पात्र असणाऱ्या लाभार्थी विदयार्थ्यांकडुन प्रवेशाच्या वेळी महाविदयालयाच्या संबंधित अभ्यासक्रमाकरीता शिक्षण शुल्क नियमन प्राधिकरणाने (शासकीय संस्थांकरीता शासनाने) निर्धारित केलेले शिक्षण शुल्काची शासनाकडुन या योजनेंतर्गत प्रतिपूर्ती संबंधित शैक्षणिक संस्थेस करण्यात येईल. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्राधिकरणाने निर्धारीत शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतची प्रतिपुती शासनामार्फत करण्यात येईल.

६. सदरहू योजनेचा लाभ शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पुर्वी वा चालु शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांच्या पुर्ण कालावधीपर्यंत या शासन निर्णय दि. १३ ऑक्टोबर, २०१६ तील अटी शर्तीनुसार लागू राहील.

७. उच्च व तंत्र शिक्षण विभागा अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या संबधित सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या

८. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे (CAP) प्रवेश घेतलेला आहे, असे विद्यार्थी या योजनेअंतर्गत लाभास पात्र असतील.

९. सदर योजना ही खाजगी अभिमत विद्यापीठ अथवा खाजगी स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठातील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

१०. सदर योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ हा शासनाने निश्चित केलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केवळ महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र असणा-या विदयार्थ्यांसाठीच मर्यादित राहील.

११. शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनापैकी केवळ कोणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबधित विद्यार्थी पात्र असेल. म्हणजेच अन्य योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी कोणत्याही शिष्यवृत्ती/ शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ घेत असल्यास सदर विद्यार्थी या योजनेतंर्गत लाभ मिळण्यास पात्र असणार नाही.

१२. लाभार्थी विद्यार्थ्याने नियमितपणे महाविद्यालय / तंत्रनिकेतनामध्ये शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे आवश्यक राहील व प्रत्येक सत्र अथवा वर्षाची परिक्षा देणे आवश्यक राहील. केवळ विशिष्ट परिस्थितीत विशेषत: आजारपणाच्या कारणास्तव परिक्षा देणे शक्य झाले नसल्यास तसे संबधित विद्यार्थी व शैक्षणिक संस्थेने शिफारस केल्यानंतर संबंधित उपसंचालक / सहसंचालक व सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील.

१३. पात्र लाभार्थी विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतल्यानंतर एखादया सत्राची (सेमिस्टरची) परीक्षा दिली नसल्यास अथवा एखादया शैक्षणिक वर्षात अनुतीर्ण झाल्याने त्या वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास पुढील वर्षाकरिता सदर विद्यार्थी या योजनेचा लाभ मिळण्यास अपात्र राहील.

१४. तथापी, तद्नंतर पुनश्च: त्या सत्रात /वर्षात परीक्षा उतीर्ण झाल्यानंतर अथवा अंशत: पास (ATKT)झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाल्यास सदर योजनेच्या लाभासाठी पुन्हा पात्र ठरेल.

१५. परंतु असे पात्र लाभार्थी विदयार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधित दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पुर्णत: अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसेल तर संबधित विद्यार्थी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेंतर्गत लाभा करीता कायमस्वरूपी अपात्र ठरेल.

१६. लाभार्थी विदयार्थी व संबधित शिक्षण संस्था यांनी सदर योजनेतंर्गत लाभ घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जात चुकीची अथवा दिशाभुल करणारी माहीती सादर केल्यास त्यास उर्वरित अभ्यासक्रमांच्या कालावधीसाठी लाभ देण्यात येणार नाही. तसेच त्या विद्यार्थ्याला / संस्थेला त्यांनी सादर केलेल्या चुकीच्या माहीतीच्या आधारे त्यापुर्वी मिळालेल्या लाभाच्या संपुर्ण रकमेची व्याजासह वसुली करण्यात येईल व कोणत्याही योजनेतंर्गत संबंधित विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती / शुल्क प्रतिपुर्ती मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल. या संदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची असेल.

१७. संबंधित विद्यार्थी स्वत:ला चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करीत नसल्याबाबत किंवा संबंधित प्राधिकाऱ्याच्या पुर्व परवानगीशिवाय अनियमितपणे गैहजर राहणे इत्यादी स्वरूपाचे गैरवर्तन असल्याबाबत संबंधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने निदर्शनास आणले तर अशा विद्यार्थ्यांची शुल्क प्रतिपुर्ती थांबविण्यात किंवा रद्द करण्यात येईल.

१८. ज्या अभ्यासक्रमाकरिता पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास प्रतिपुर्ती प्रदान करण्यात आली आहे तो अभ्यासक्रम संबंधित विद्यार्थ्याने मध्येच सोडला तर अशा विद्यार्थ्यास प्रदान केलेल्या प्रतिपुर्तीची रक्कम राज्य शासनास योग्य वाटल्यास त्याच्या / तिच्याकडून वसुल केली जाईल.

१९. सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या कोणत्याही पूर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील व असे बदल केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याबाबतचा दावा कोणत्याही विद्यार्थ्यांस किंवा शैक्षणिक संस्थेस अथवा विद्यार्थ्यांच्या पालकांना शासनाच्या विरूध्द करता येणार नाही.

२०. सदर योजनेच्या लाभाकरिता शासकीय अथवा शासन अनुदानितशैक्षणिक संस्था किंवा शासकीय विद्यापीठ वगळून अन्य सर्व खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थामधील पात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश व विदयार्थ्यांकडून आकारावयाचे असलेले शिक्षण शुल्क हे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगीव्यावसायिक शैक्षणिक (प्रवेश व शिक्षण शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतुदीनुसारशुल्क नियामक प्राधिकरणाकडून प्रत्येक वर्षी निश्चित करून अंतिम करणे आवश्यक राहील.

२१. सदर योजनेंतर्गत पात्र असणारे व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या संबंधित शैक्षणिक संस्थाना पुढील ३ वर्षाच्या आत म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर संस्थेकडून मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करणे (Assessment and Accreditation)आवश्यक राहील. तद्नंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संबंधित शिखर संस्थाकडून मुल्यांकन व दर्जा निश्चित करून मुल्यांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थाना मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त होईपर्यंत या योजनेतून वगळण्यात येईल व त्या वर्षापासून केवळ मानांकन प्राप्त करणाऱ्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिताच सदर योजना लागू राहील.

२२. विदयार्थ्याने व संस्थेने शासन निर्णयाचे अवलोकन करावे वत्यातील माहिती ग्राह्य राहील.

----x----